जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०६/२०२३
## दि.१७/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २४३/२०२३,भादविक ३०७,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ३(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२१,रा.रामनगर,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०६/२०२३ रोजी १६/१० वा.जय भवानी चौक,रामनगर,वारजे,पुणे येथील फिर्यादी यांचे घरासमोर रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे ओळखीचे असुन,फिर्यादी हे नमुद ठिकाणी त्यांचे घराचे समोरील रोडवर मित्रांसह क्रिकेट खेळत असताना,सदर इसम हे मोटार सायकलवर येवुन,त्यापैकी एक इसमाने फिर्यादीस जवळ बोलावुन,आज तुला खल्लासच करतो असे म्हणुन त्याचेकडील बंदुक फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे दिशेला रोखले. त्यावेळी सदरची बंदुक ही हाताने वळविल्याने,त्यातील गोळया जमिनीवर फायर झाल्या. त्यानंतर बंदुकीने फिर्यादी यांचेवर फायर केल्याने,त्यातील गोळी फिर्यादी यांचे कमरेच्या पाठीमागे डाव्या बाजुस लागुन,त्यामध्ये त्यांना गंभीर दुखापत करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. काळे ९९७५२२९६९३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २७०/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६० वर्ष,रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०६/२०२३ रोजी सकाळी ०५/४५ वा.मातोश्री हौसींग सोसायटी बिल्डींग नं.५,नागपाल रोड, चंदननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया सकाळी नमुद ठिकाणाहुन प्रभातफेरी मारीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकी वरून पाठीमागुन त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ८०,०००/- रू किमतीचे जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अरविंद कुमरे ९५५२५३८३७१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ३९०/२०२३,भादविक ३८१,३४ |
| **फिर्यादी** | संजय तारडे,वय-४२ वर्ष,रा.सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०६/२०२३ रोजी १६/३० वा. ते १६/५० वा.चे दरम्यान झुंज बंगला,सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे झुंज बंगला येथे कामास असुन,बंगल्यात असलेली देखरेखीची व इतर कामे करत असतात. सदर बंगल्यातील मालकांसाठी त्यांचेकडील वाहने चालविण्याकरीता यातील नमुद इसम हा कार |

|  |  |
|---|---|
|  | वर चालक म्हणुन काम करीत असताना,त्याने त्याचे सोबत असलेल्या साथीदार यांनी आपसात संगनमत करून,झुंज बंगला येथे पार्क केलेल्या कार मधुन फिर्यादी यांचे मालक यांनी ठेवलेले सोन्याचे मंगळसुत्र १,५०,०००/- रु किंचे व ६०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण २,१०,०००/- रू किचा ऐवज चोरी करुन नेला आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रुपेश चाळके ९५५२५२६६०३ |
| ४ |  |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २८२/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | प्रमोद जाधव,वय-३४ वर्षे,रा.रामटेकडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०६/२०२३ रोजी २२/०० वा.ते दि.१६/०६/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा.चे दरम्यान आर्मी इन्स्टीटयुट ऑफ फिजीकल ट्रेनिंग रामटेकडी,पुणे-सोलापुर रोड,पुणे मधील मा.समादेशक यांचे एपीटीसी निवासस्थान येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आर्मी इन्स्टीटयुट ऑफ फिजीकल ट्रेनिंग येथे सिक्युरिटी एन.सी.ओ. म्हणुन नोकरीस आहेत. सदर आर्मी एरीया मध्ये मा.समादेशक यांचे एपीटीसी निवासस्थानाच्या बाजुला विविध प्रकारची झाडे असुन,त्यामध्ये काही चंदनाची देखील झाडे आहेत. नमुद वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात चोरटयाने एपीटीसी निवासस्थानाचे पाठीमागुन गेटच्या आत मध्ये येवुन,कंपाऊंडच्या जवळ असलेल्या चंदनाच्या झाडां पैकी दोन चंदनाची झाडे,अंदाजे १० फुट लांबीचे ओंडके ३०,०००/- रु किंचे बुंध्यापासुन कापुन चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, राऊत ९५५२५८२०७० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**